Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education,
Kolhapur Divisional Board,
539, Rajendranagar,
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
539, राजेंद्रनगर, कोल्हापूर -
416004

Ph. No. (0231) 2696101/ 2 / 3 Website - www.sscboardkolhapur.in Email - divsec.kop@gmail.com

क्र. कोविमं/लेखा/परीक्षा शुल्क/फेब्रु-मार्च 2027/ 3602
कोल्हापूर - 416004
दिनांक : 06 / 10 / 2026

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
मान्यताप्राप्त सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर जिल्हा

**विषय** : इ. 10 वी व इ.12 वी बोर्ड परीक्षेचे शुल्क विद्यार्थ्यांकडून स्वीकारल्यानंतर अधिकृत शुल्क पावती व शुल्काचा तपशील (Fee Breakdown) उपलब्ध करून देणेबाबत.

**संदर्भ** : राज्य मंडळाचे क्र.रा.मं./लेखा-6/परीक्षा शुल्क /4118, दिनांक 05.10.2026 रोजीचे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, इ.10 वी व इ.12 वीच्या बोर्ड परीक्षेसाठी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारण्यात येते. विद्यार्थ्यांकडून स्वीकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काबाबत पारदर्शकता राहणे तसेच विद्यार्थ्यांना त्यांनी भरलेल्या शुल्काची स्पष्ट माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना खालील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

1. इ. 10 वी व इ.12 वी च्या बोर्ड परीक्षेचे शुल्क विद्यार्थ्यांकडून स्वीकारल्यानंतर विद्यार्थ्यांना अधिकृत शुल्क पावती देण्यात यावी.
2. सदर पावतीमध्ये विद्यार्थ्याकडून स्वीकारण्यात आलेल्या एकूण शुल्काचा स्पष्ट व संपूर्ण तपशील (Fee Breakdown) नमूद करण्यात यावा.
3. बोर्ड परीक्षा शुल्काव्यतिरिक्त परीक्षा प्रक्रियेशी संबंधित अन्य कोणतेही शुल्क आकारण्यात येत असल्यास, त्याचा स्वतंत्र व स्पष्ट तपशील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात यावा.
4. शुल्क स्वीकारल्यानंतर पावती देण्यात येत नसल्याच्या अथवा शुल्काचा स्पष्ट तपशील उपलब्ध करून देण्यात येत नसल्याच्या तक्रारी निर्माण होणार नाहीत, यांची संबंधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी दक्षता घ्यावी.
5. विद्यार्थ्याकडून शुल्क स्वीकारण्याच्या वेळीच संबंधित विद्यार्थ्यांस पावती देण्याची कार्यपध्दती नियमितपणे अवलंबविण्यात यावी.

सदर कार्यवाहीमुळे विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काच्या व्यवहारात पारदर्शकता व स्पष्टता राहण्यास मदत होईल. तरी सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी उपरोक्त सूचनानुसार कार्यवाही करणेबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

**(गजानन तानाजी उकिर्डे)**
**विभागीय सचिव,**
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**प्रत माहितीस्तव** :

मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे.

**प्रत माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव** :

1. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
2. शिक्षणाधिकारी (माध्य), सातारा / सांगली / कोल्हापूर

D/Ansar/Exam Fee Letter